पोलीस अधीक्षक पालघर
कार्यालय

पत्ता- पालघर बोईसर रोड, कोळगाव,जि. पालघर
दुरध्वनी- ८६६९६०४१०० (कार्यालय)
E-mail : bharosacell.palghar@gmail.com



जावक क्रमांक- पोअ/भरोसा सेल/ 512 /२०२५ दिनांक-14/०६/२०२५.

प्रति,

मा.प्रभारी आधिकारी
सायबर पोलीस ठाणे, पालघर
यांना सविनय सादर...

विषय :- आंतरजातीय/आंतरधर्मीय विवाह करणाऱ्या जोडप्यांना सुरक्षेततेकरीता पालघर घटकात स्थापन विशेष कक्षाचा पत्ता, दुरध्वनी क्रमांक तसेच विशेष कक्षातील सदस्यांची नावे याची माहिती पालघर पोलीस दलाचे संकेतस्थळावर प्रसिध्द करणेबाबत.

संदर्भ :- १. मा. जिल्हाधिकारी, ठाणे यांचेकडील ई-मेल दि. १८/१२/२०२४.

२. मा. कक्ष अधिकारी, सामाजिक न्याय व विशेष सहाय्य विभाग, महाराष्ट्र शासन, मंत्रालय, मुंबई यांचेकडील पत्र क्र. आंतजा-२०२४/प्र.क्र.२१४/सामासु, दिनांक- १७/१२/२०२४.

३. पत्र क्रमांक- १४/ वाचक/त.अर्ज/सर्व घटक/१०९९९/२१३३/२०२४/६३३५, दिनांक-२४/१२/२०२४.

४. मा. सर्वोच्च न्यायालय, नवी दिल्ली यांचे रिट याचिका क्र.२३१/२०१०, शक्ती वाहिनी विरुध्द भारत सरकार व इतर या याचिकेतील दिनांक.२७.०३.२०१८ रोजीचे आदेश.

५. उप सचिव, गृह मंत्रालय, भारत सरकार, नवी दिल्ली यांचे दिनांक.३१.०५.२०१८ रोजीचे पत्र.

६. शासन परिपत्रक क्रमांक न्याया.प्र-०५१८/प्र.क्र.३८७(भाग-१) विशा-६,दिनांक.१९.१२.२०२३ तसेच दिनांक.१३.०९.२०२४ रोजीचे परिपत्रक.

७. रिट पिटीशन क्रमांक ३२४८/२०२३, अंकुर कुमार भास्कर कुमार दुबे वि. महाराष्ट्र राज्य व इतर या खटल्यात मा.उच्च न्यायालय यांनी दिनांक.०९.१२.२०२४ रोजीचे आदेश.

८. महराष्ट्र शासन, गृह विभाग, शासन परिपत्रक क्रमांक-न्यायाप्र-०५१८/प्र.क्र.३८७(भाग-१)/विशा-६, दिनांक- १६ डिसेंबर, २०२४.

९. **महाराष्ट्र शासन, गृह विभाग, शासन निर्णय क्र. न्यायाप्र-०५१८/प्र.क्र.३८७/(भाग-१) विशा-६, दिनांक-१३ मे २०२५.**

१०. **मा. पोलीस महासंचालक, महाराष्ट्र राज्य, मुंबई यांचेकडील पत्र जा.क्र. पोमसं/ ३६/ र. व का. (८३००) शा.नि. अधिसूचना/०७/२०२५, दिनांक- १५/०५/२०२५**

महोदय,

उपरोक्त विषयांकित संदर्भान्वये सादर की, मा. सर्वोच्च न्यायालयाने रिट याचिका (दिवाणी) क्रमांक २३१/२०१०, शक्ती वाहिनी विरुध्द भारत सरकार व इतर या याचिकेमध्ये दिनांक २७.०३.२०१८ रोजी दिलेल्या न्यायनिर्णयाद्वारे आंतरजातीय/ आंतरधर्मीय विवाह करणाऱ्या जोडप्यांना सुरक्षा देण्याच्या अनुषंगाने सर्व राज्यांना प्रत्येक जिल्ह्यात विशेष कक्ष (Special Cell) सुरक्षागृहे स्थापन करणेबाबत सुचना दिल्या आहेत. तसेच महाराष्ट्र शासन, गृह विभाग, शासन परिपत्रक क्र. न्यायाप्र-०५१८/प्र.क्र.३८७(भाग-१)/विशा-६, दिनांक- १६ डिसेंबर- २०२४ अन्वये मानक कार्यप्रणाली (SOP) मध्ये विहित केलेनुसार आंतरजातीय /आंतरधर्मीय विवाह करणा-या जोडप्यांना सुरक्षा पुरविण्याच्या अनुषंगाने विशेष कक्ष (**Special Cell**) सुरक्षागृहे स्थापन करुन सविस्तर अहवाल सादर करणचे निर्देश प्राप्त आहेत.

पालघर घटकात महाराष्ट्र शासन,गृह विभाग यांचेकडील सुधारीत मानक कार्यप्रणाली (SOP) मधील सुचनेनुसार विशेष कक्ष (**Special Cell**) सुरक्षागृहे स्थापन करणेबाबत आदेशी केलेले आहोत.

१. पालघर घटकात पोलीस अधीक्षक, पालघर यांचे अध्यक्षतेखाली आंतरजातीय /आंतरधर्मीय विवाह करणा-या जोडप्यांना सुरक्षा पुरविण्याच्या अनुषंगाने विशेष कक्ष (**Special Cell**) स्थापन करण्यात आले आहे. पालघर घटकात स्थापन विशेष कक्षाची माहिती खालीलप्रमाणे आहे.

विशेष कक्षाची रचना				पत्ता	संपर्क तपशील
अ. क्र.	नाव	समिती अध्यक्ष व सदस्य	पदनाम		
१.	श्री.यतिश देशमुख	पोलीस अधीक्षक, पालघर	अध्यक्ष	पोलीस अधीक्षक कार्यालय, पालघर, पालघर बोईसर रोड,कोळगाव,जि. पालघर-	८६६९६०४००१ ८६६९६०४१०० ८६६९६०९५४४
२.	श्री.व्यकंटराव हुंडेकर	जिल्हा समाज कल्याण अधिकारी, पालघर	सदस्य	समाज कल्याण कार्यालय, पालघर	९४२३५१६५०७
३.	श्री.विवेक चौधरी	जिल्हा महिला व बाल विकास अधिकारी, पालघर	सदस्य सचिव	जिल्हा महिला व बाल विकास अधिकारी कार्यालय, पालघर	९४२१८२६८४८

२. महाराष्ट्र शासन, गृह विभागाकडुन शासन परिपत्रक क्रमांक-न्यायाप्र-०५१८/प्र.क्र.३८७(भाग-१)/विशा-६, दिनांक- १८ डिसेंबर, २०२४ चे परिपत्रकाव्दारे महाराष्ट्रातील जिल्हानिहाय सुरक्षागृहांचा (Safe Houses) तपशिल घोषित केला आहे. त्यामध्ये पालघर जिल्हयाकरीता " शासकिय विश्रामगृह" मनोर, ता. पालघर, जि. पालघर हे सुरक्षागृह (Safe House) घोषित केले आहे.

एकंदरीत पालघर घटकात महाराष्ट्र शासन, गृह विभाग यांचेकडील सुधारीत मानक कार्यप्रणाली (SOP) मधील सुचनेनुसार विशेष कक्ष (**Special Cell**) सुरक्षागृहे (**Safe Houses**) स्थापन करण्यात आली आहेत. **तरी पालघर घटकात स्थापन विशेष कक्षाचा पत्ता, दुरध्वनी क्रमांक तसेच विशेष कक्षातील सदस्यांची नावे याची माहिती पालघर पोलीस दलाचे संकेतस्थळावर प्रसिध्द करण्यास विनंती आहे.**

करीता सविनय सादर

(सविता सुळे)
पोलीस उप निरीक्षक
प्रभारी अधिकारी
महिला सहाय्यक कक्ष, पालघर
अति.कार्यभार भरोसा सेल, पालघर